## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हींसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ

(सामान्य प्रशासन शाखा)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रवीन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी: कार्यालय: ०७१२–२५२२९९१ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


# अधिसूचना

क्रमांक: रातुमनावि/साप्र/१७/१६ दिनांक: १७ नोव्हेंबर २०१७

## अधिसभा, विद्यापरिषद व अभ्यास मंडळ निवडणूक

## शनिवार, दिनांक २५ नोव्हेंबर २०१७

## (उमेदवारांची यादी, मतदान केन्द्र, मतदानासाठी ओळखपत्र व मतदान प्रक्रिया)

विद्यापीठ अधिसूचना क्रमांक रातुमनावि/साप्र/२०१७/१०, दिनांक २६ ऑक्टोंबर, २०१७ ला जोडून सर्व संबंधित मतदारांना सूचित करण्यात येते की,

१. अधिसभा, विद्या परिषद व अभ्यास मंडळाची **निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१७ रोजी विद्यापीठ संकेतस्थळ www.nagpuruniversity.org वरील Election - 2017 या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

२. विद्यापीठाने निश्चित केलेल्या **मतदान केंद्रांची यादी मतदारसंख्येनिहाय** वरील पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आली आहे. अंतीम मतदार यादीत मतदाराला देण्यात आलेल्या मतदान केन्द्राचा सांकेतांक (Code) नमूद करण्यात आला आहे. मतदारांनी त्यांना नेमून दिलेल्या मतदान केन्द्रावरच **दिनांक २५ नोव्हेंबर, २०१७ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ यावेळात जाऊन मतदान करावे.** नेमून दिलेल्या मतदान केन्द्राशिवाय अन्य मतदान केन्द्रावर मतदारास मतदान करता येणार नाही. या निवडणूकीत मतदार महाविद्यालय व विद्यापीठ शैक्षणिक विभागातील शिक्षक असल्यामुळे महाविद्यालयांचा गट करून मतदान केन्द्रात त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

३. **मतदारांनी खालीलपैकी एक ओळखपत्र दाखवून मतदान करावे:**

१. निवडणूक आयोगाने दिलेले ओळखपत्र,
२. आधारकार्ड,
३. छायाचित्र असलेला वाहन परवाना,
४. छायाचित्र असलेले पॅन कार्ड,
५. नियोक्त्याने दिलेले छायाचित्रासह ओळखपत्र.

ज्या महिला मतदारांचे नांव विवाहपूर्व नावाने मतदार यादीत समाविष्ट असेल, परंतु त्यांच्याकडे वर उल्लेखित ओळखपत्र विवाहानंतरच्या नावाने असेल अशा महिला मतदारांनी खालील कोणताही एक दस्ताऐवज वरील कोणत्याही एका ओळखपत्रासह निवडणूक अधिकाऱ्याला दाखवून मतदान करावे.

१. वडीलांच्या नावाचा समावेश असलेला पासपोर्ट.
२. वडीलांचे नांव असलेले आयकर विभागाचे पॅनकार्ड.
३. विवाह नोंदणी प्रमाणपत्र.
४. नावातील बदलाविषयीचे प्रकाशित राजपत्र किंवा त्यावेळी सादर केलेले प्रतिज्ञापत्र.
५. क्रमांक १ ते ४ वरील कोणताही दस्ताऐवज उपलब्ध नसल्यास मतदाराने रू.१००/–च्या स्टॅम्प पेपरवर नावात झालेल्या बदलासंबंधी छायाचित्रासह दिलेले प्रतिज्ञापत्र.